।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229242 **NATONAL SERVICE SCHEME DEPARTMENT**

Fax : (02462) 229574 Website: wwwsrtmun.ac.in E-mail: srtmunss2018@gmail.com


जा.क्र. : रासेयो/२०२१–२२/90 दिनांक :०१/०७/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संग्लनीत महाविद्यालये,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

विषय : राष्ट्रीय सेवा योजना सन २०२०–२१ या वर्षाचे राज्स्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत...

सदर्भ : रा.से.यो.–२०२१/(प्र.क्र.६०/२१)/साशि–७ दि. २९ जून,२०२१.

महोदय,

राष्ट्रीय सेवा योजना रौप्यमहोत्सवी वर्षापासुन महाराष्ट्र शासन व केंद्रशासन यांच्याकडुन राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाविद्यालय (एकक), कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांना दरवर्षी राज्यस्रीय व राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतात. त्यानुसार २०२०–२१ या शैक्षणिक वर्षामध्ये व मागील तीन वर्षामध्ये ज्या महाविद्यालय/कार्यक्रम अधिकारी /स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सेवा योजने मध्ये उत्कृष्ट कार्य केले आहे. त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. तसेच केंद्रशासनाच्या मार्गदर्शक नियमावालीनुसार राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त प्रस्तावापैकी पात्र प्रस्तावाची केंद्रशासनाकडे राष्ट्रीय पुरस्कारासाठी शिफारस केली जाईल. असे संदर्भीय पत्रानुसार कळविले आहे तरी सोबत जोडण्यात आलेल्या महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रविभाग, मंत्रालय मुंबई यांच्या परीपत्रकाचे अवलोकन करून कार्यवाही करण्यात यावी, तसेच सन २०२०–२१ या वर्षासाठीच्या राष्ट्रीय सेवा योजना ऑनलाईन प्रस्तावासाठी पुढील दिलेल्या तक्त्यानुसार कार्यवाही करावी, ही विनंती.

संचालक
डॉ. शिवराज बोकडे
(रा.से.यो.विभाग प्रस्तुत विद्यापीठ)

।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229242 NATONAL SERVICE SCHEME DEPARTMENT
Fax : (02462) 229574 Website: wwwsrtmun.ac.in E-mail: srtmunss2018@gmail.com

ऑनलाईन प्रस्तावासाठी पुढील दिलेल्या तकत्यानुसार कार्यवाही करावी.

| क्रं | | सुरुवात दिनांक | अंतिम दिनांक | कार्यवाहीस्तव |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी व प्रस्ताव सादर करणे | | | |
| ०१ | स्वयंसेवक | ०२/०७/२०२१ | १०/०७/२०२१ | |
| ०२ | कार्यक्रम अधिकारी | ०५/०७/२०२१ | १०/०७/२०२१ | |
| | प्रथम ऑनलाईन छाननी | | | |
| ०१ | स्वयंसेवक | ०३/०७/२०२१ | ११/०७/२०२१ | महाविद्यालयीन स्तरीय छाननी |
| ०२ | कार्यक्रम अधिकारी | ०६/०७/२०२१ | ११/०७/२०२१ | विद्यापीठस्तरीय छाननी |
| | प्रथम गुणवत्ता यादी प्रसिध्द | | | |
| ०१ | स्वयंसेवक | | १२/०७/२०२१ | महाविद्यालयीन स्तरीय |
| ०२ | कार्यक्रम अधिकारी | | १२/०७/२०२१ | विद्यापीठ स्तरीय |
| | द्वितीय छाननी | | | |
| ०१ | स्वयंसेवक | १३/०७/२०२१ | १५/०७/२०२१ | विद्यापीठस्तरीय प्रत्यक्ष छाननी |
| ०२ | कार्यक्रम अधिकारी | १३/०७/२०२१ | १५/०७/२०२१ | विद्यापीठस्तरीय प्रत्यक्ष छाननी |
| | अंतिम छाननी गुणवत्ता यादी प्रसिध्द | | | |
| ०१ | स्वयंसेवक | | २३/०७/२०२१ | शासन स्तरीय |
| ०२ | कार्यक्रम अधिकारी | | २३/०७/२०२१ | शासन स्तरीय |

अधिक माहितील व प्रक्रिये करिता सोबतच्या पत्राचे व कार्यपध्दतीचे अवलोकन करावे.

१. अधिक माहितीसाठी https.//nssmaharashtra.org.in. या संकेतस्थळावरील माहिती पहावे.

मा. सिस्टीम एक्सपर्ट यु.जी.सी. संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ नांदेड सदरील परीपत्रक संकेतस्थळावर, टाकून सहकार्य करावे.

संचालक
डॉ. शिवराज बोकडे
(रा.से.यो.विभाग प्रस्तुत विद्यापीठ)

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५.

==========================================

क्रमांक: रासेयो-२०२१/( प्र. क्र.६०/२१) /साशि-७ दिनांक: २९ जून, २०२१.

प्रति,

१)मा. कुलगुरु (सर्व विद्यापीठे)

२)संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

३)संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई

४) संचालक, उन्नत प्रौद्योगिकी रक्षा संस्था, पुणे.

५) सहायक शिक्षण संचालक, + २ स्तर, पुणे.

विषय:- राष्ट्रीय सेवा योजना सन २०२०-२१ या वर्षाचे राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत...

महोदय,

राष्ट्रीय सेवा योजना रौप्य महोत्सवी वर्षापासून महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांचेकडून राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबदल विद्यापीठ, कार्यक्रम समन्वयक, महाविद्यालय (एकक) कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांना दरवर्षी राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतात. त्यानुसार २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये व मागील ३ वर्षामध्ये ज्या विद्यापीठ/कार्यक्रम समन्वयक/ महाविद्यालय/ कार्यक्रम अधिकारी/ स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केले आहे त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक नियमावलीनुसार राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त प्रस्तावांपैकी पात्र प्रस्तावांची केंद्र शासनाकडे राष्ट्रीय पुरस्कारासाठी शिफारस केली जाईल.

प्रत्येक विद्यापीठाने त्यांच्या अंतर्गत असलेल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अतंर्गत कार्य करणाऱ्या स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांचे प्रस्ताव मागवून त्यांची नियमानुसार छाननी करुन विद्यापीठस्तरावर एक उत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक/कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक यांचे प्रस्ताव (एक मराठी व एक इंग्रजी ) प्रत्येकी एक प्रती मध्ये शासनाकडे निवड करण्यासाठी पाठवावे, त्यामधून एक कार्यक्रम समन्वयक, चार कार्यक्रम अधिकारी आणि २७ विद्यापीठाचे २७ स्वयंसेवक यांना राज्यस्तरावरुन उत्कृष्ट पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल आणि त्यामधून राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कारासाठी एक कार्यक्रम समन्वयक, दोन कार्यक्रम अधिकारी, चार स्वयंसेवक यांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविले जातील.

सन २०१९-२० या वर्षापासून मा. सचिव यांचे सूचनेनुसार राष्ट्रीय सेवा योजनेचे पुरस्कार ऑनलाईन स्वरुपामध्ये सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना पुरस्कारासाठीचे प्रस्ताव सादर करणे शक्य होणार आहे. यास्तव सन २०२०-२१ साठीच्या रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी पुरस्कार प्रस्तावांची छाननी सर्वप्रथम महाविद्यालय स्तरावर करण्यात येईल. महाविद्यालय स्तरावर छाननीअंती सर्वोत्तम गुण मिळवणाऱ्या रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांचे कागदोपत्री पुरावे छायांकित प्रत स्वरुपात विद्यापीठांनी प्राप्त करावेत व त्यानंतर विद्यापीठ स्तरावर छाननी करणे आवश्यक आहे. रासेयो स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी आणि कार्यक्रम समन्वयक यांची विद्यापीठ स्तरावर छाननी होऊन पात्र ठरविण्यात आलेले प्रस्ताव राज्य स्तरावर अंतिम छाननी करण्यात येतील.

कोविड-१९ या संसर्गजन्य काळातील आपत्कालीन व प्रतिबंधित परिस्थिती विचारात घेऊन आणि या कालावधीत रासेसो स्वयंसेवकांनी नियमित उपक्रम कालावधी व्यतिरिक्त केलेली अतिरिक्त उपक्रम/कार्य हे विशेष शिबिराची समकक्षता म्हणून ग्राहय धरुन रासेयो पुरस्कारासाठी पात्र ठरविण्याबाबत युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांना पत्रव्यवहार करत आहोत. परिणामी रासेयो पुरस्कारासाठी सन २०२०-२१ या वर्षीचे विशेष शिबिरांचे प्रमाणपत्र अनिवार्य असणार नाही.

रासेयो विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी यांचे प्रस्ताव प्रत्येक स्तरावर छाननी झाल्यानंतर विद्यापीठ स्तरावर सर्वाधिक गुण मिळालेल्या एक रासेयो विद्यार्थी व एक कार्यक्रम अधिकारी यांचे मराठी व इंग्रजीतील प्रस्ताव रासेयो स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, प्राचार्य, कार्यक्रम समन्वयक व विद्यापीठाचे कुलगुरु यांच्या सही शिक्क्यानिशी दिनांक २०.०७.२०२१ पर्यंत वा पूर्वी शासनास सादर करावेत. कार्यक्रम समन्वयक यांच्या प्रस्तावाची विद्यापीठ स्तरावर छाननी करुन प्रस्तावाची मराठी व इंग्रजी प्रत दिनांक २०.०७.२०२१ पर्यंत वा पूर्वी शासनाकडे सादर करावी. विहीत मुदतीनंतर प्राप्त प्रस्तावांचा विचार अंतिम छाननी व पुरस्कार निवडीकरीता केला जाणार नाही.

सन २०२०-२०२१ या वर्षासाठीच्या राष्ट्रीय सेवा योजना ऑनलाईन प्रस्तावासाठी पुढील दिलेल्या तक्त्यानुसार कार्यवाही करावी-

| अ.क्र | | सुरुवात दिनांक | अंतिम दिनांक | कार्यवाही स्तर |
|---|---|---|---|---|
| | | नोंदणी व प्रस्ताव सादर करणे | | |
| १ | स्वयंसेवक | ०२.०७.२०२१ | १०.०७.२०२१ | |
| २ | कार्यक्रम अधिकारी | ०५.०७.२०२१ | १०.०७.२०२१ | |
| ३ | कार्यक्रम समन्वयक | ०५.०७.२०२१ | १०.०७.२०२१ | |
| | | प्रथम ऑनलाईन छाननी | | |
| १ | स्वयंसेवक | ०३.०७.२०२१ | ११.०७.२०२१ | महाविद्यालयीन स्तरीय छाननी |
| २ | कार्यक्रम अधिकारी | ०६.०७.२०२१ | ११.०७.२०२१ | विद्यापीठ स्तरीय छाननी |
| ३ | कार्यक्रम समन्वयक | १२.०७.२०२१ | १५.०७.२०२१ | शासन स्तरीय छाननी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम गुणवत्ता यादी प्रसिध्द | | | | |
| १ | स्वयंसेवक | | १२.०७.२०२१ | महाविद्यालयीन स्तरीय |
| २ | कार्यक्रम अधिकारी | | १२.०७.२०२१ | विद्यापीठ स्तरीय |
| द्वितीय छाननी | | | | |
| १ | स्वयंसेवक | १३.०७.२०२१ | १५.०७.२०२१ | विद्यापीठ स्तरीय प्रत्यक्ष छाननी |
| २ | कार्यक्रम अधिकारी | १३.०७.२०२१ | १५.०७.२०२१ | विद्यापीठ स्तरीय प्रत्यक्ष छाननी |
| अंतिम छाननी गुणवत्ता यादी प्रसिध्द | | | | |
| १ | स्वयंसेवक | | २३.०७.२०२१ | शासन स्तरीय |
| २ | कार्यक्रम अधिकारी | | २३.०७.२०२१ | शासन स्तरीय |
| ३ | कार्यक्रम समन्वयक | | २३.०७.२०२१ | शासन स्तरीय |

आपला,

(डॉ. प्रभाकर ब. देसाई)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी

प्रत,
१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक,
२) श्री. जी.कार्तीगुने , राष्ट्रीय सेवा योजना, प्रादेशिक संचालक, पुणे
३) कार्यक्रम समन्वयक, सर्व रासेयो विद्यापीठे / संचालनालये, अभिमत विद्यापीठे.